**[वेळ: २½ तास]** **[गुण:७५]**

Please check whether you have got the right question paper.

**सूचना**: १) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**प्र.१** **अ)** भाषांतर म्हणजे काय ते सांगून रुपांतर, अनुवाद व अर्वाचीनीकरण या संकल्पनांमधील साम्यभेद सोदाहरण स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

भाषांतरप्रक्रियेत सांस्कृतिक भेदांची अडचण कशी उद्भवते, ते सविस्तर स्पष्ट करा.

**प्र.२** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** इंग्रजी उताऱ्यांचे मराठीत भाषांतर करा. **१५**

**अ)** Many times people believe in things which are not really logical or reasonable. For example, many people believe that if a cat (especially a black cat) crosses your path, then your work will not be done.

Actually there is no evidence to show that this is true. But these people do not wait to find out whether it is true or not. As soon as they see a black cat crossing their path, they turn around, go back and then start all over again. They don't think they have blind faith in their belief.

**आ)** Mahatmaji was a real leader of men and the people. He never played to the gallery of cared to secure cheers from the crowd. Indeed more than at any time, today, there is an urgent need to understand the message of Bapu. He believed in work and according to him, life should be one, of ceaseless activity. He never believed in the maxim that "ends justify the means". If only he lived for another quarter of a century he would have established international peace based upon his philosophy of life. Because once he said, "no nation belongs to itself, every nation belongs to the world. I want my country to be free so that it might die to serve the cause of humanity."

**इ)** Chhatrapati Shahu Maharaj ruled the prinedy state of Kolhapur between 1894 and 1922. But within this short period of twenty eight years, Shahu achived great things for his people. It may seem strange, but this ruler himself laid foundations of democracy in the state. All his life was spent in enabling the poor and oppressed people to be their own masters.

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** लीळांचे प्रमाण मराठीत अर्वाचीनीकरण करा. **१५**

**अ)** श्रीप्रभु व्दारावतीए बीजें केलें : संन्यासु स्वीकारीला : मग रीधपुरा बीजे केले : तेथौनि मागौते व्दारावतीए बीजे केले : गोमतीदएचा तीरी जपत होते : पुढा दंडू रोविला असे : तेथ गोसावी बीजे करीता वरी सूप ठेविलें : वरी खराटेनि हाणितले : दंडू मोडुनि गोमतीएमध्ये घातला : तेथ श्रीप्रभु शक्ती स्वीकरीलि: मग रीधपुरा बीजें केले ||

**(पुढे पहा....)**

**आ)** एकीं गावी म्हातारी एकीचा पुत गोरुवें राखे : तेणेसी गोसावीयासि पाडु प्रज्ञान आति : तीए गावी गोसावियासि वृक्षा खालि आसन : ऐसां तेयासि जरू आला : तयाचीया माता म्हणीतले : 'जी जी: तेयासि जरू आला : आता गोरुवें आणिकासि नीरोविति : आम्ही मेलों : गोसावी तेयाचीया घर बीजें केलें : तेयाचें पांघरूनि तेया सरिसा पहुड स्वीकारिला : तेयासि समाधान जालें : तो गोरुवांसरिया पाठविला : तेयाची माए गोसावियासि पथ्य करी : केतुलेया एका दीसां : गोसावी समाधान स्वीकारीले : मग त्ये गोसावीया नीगो नेदीति : सर्वज्ञे म्हणीतले : 'हे तयासि भांडौनि निघाले' हे गोष्टी मुतानंदाप्रति सांघितली : ||

**इ)** एकू वेळ रानीं जाळी एकी बीजें केले होतें : तेथ लाहासिचीं पीली होतीं : ते पारधी गेली होती : तीयें पीली गोसावी खेळवीली : तवं ते आली : गोसावी अवलोकीली : रोखू नीवर्तला : मग ते गोळी टेकौनी बैसली : सूनेयाचिया परी : मग नावेक गोसावी पीली खेळविलीं : वडुवे धरुनि एरी काडीया ऐरी कडी घातलीं : मग तीएचीं तीएकडे घालुनि गोसावी बीजें केलें : ||

**प्र.४ अ)** पुढीलपैकी **एका** उताऱ्याचे आकलन करून त्यावर आधारित प्रश्नांची प्रत्येकी ३ ते ५ वाक्यात उत्तरे लिहा. **१५**

मोठेपणी कोण होणार? या आमच्या लहानपणी, म्हणजे ५० वर्षापूर्वी हमखास विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाला नेमकी अशी चार ते पाचच उत्तरं होती. ड्रायव्हर, डॉक्टर ते वैमानिक या रेंजमधली. हल्ली हा प्रश्न विचारला जातो की नाही, हे मला ठाऊक नाही. पण नसावा, असा अंदाज आहे. याचं कारण असं की अपत्यसंख्या मर्यादित असल्यानं मुलानं काय बनायचं हे बहुधा पालकच ठरवतात. किंवा काही ठिकाणी मुलगा हुशार असेल तर कळत्या वयात तो स्वतःच ठरवतो. आईवडिलांनी ठरवूनही नंतर स्वतःच्या आवडीचं करिअर किंवा कार्यक्षेत्र निवडणारे, गुणवंतही काही कमी नाहीत. उदाहरणंच द्यायची तर डॉक्टर पदवी संपादन करणारे डॉ. श्रीराम लागू, डॉ. काशिनाथ घाणेकर, डॉ. गिरीश ओक, डॉ. सलील कुलकर्णी हे वेगळ्याच प्रांतात चमकले.

एकूण कोण होणार या प्रश्नाला आजच्या काळात शेकडो पर्याय उपलब्ध झालेले आहेत. रेडिओ निवेदक, निवेदक, सूत्र संचालक, उसना आवाज देणारं डबिंगचं क्षेत्र, जाहिरात,एफ.एम. या लोकप्रिय माध्यमातला आर. जे. किंवा रेडिओ जॉकी.. ही काही आवाजाची क्षेत्रे झाली. या सर्वच क्षेत्रात आज मागणी आहे आणि काळानुरूप वाढत जाणारी आहे.

या सर्वच क्षेत्रांना मुख्य भांडवल अर्थातच उत्तम आवाज हे आहे. या उत्तम आवाजाच्या जोरावर काही मर्यादित यश आपण नक्की मिळवू शकतो. मर्यादित अशासाठी की केवळ निसर्गदत्त गोड आवाज ही जरी मूलभूत गरज असली तरी अमर्याद आणि भव्य यशासाठी आवाजासोबतच आणखी काही जोडगुणांची गरज आहे. ती म्हणजे गोड आवाजाबरोबर बुद्धीमत्ता!

यात रेडिओ निवेदक होण्यासाठी एक लक्षात ठेवलं पाहिजे, की आता कायमस्वरूपी असं हे पद, आता हंगामी स्वरूपाचं झालं आहे. ८ ते १० दिवसांच्या करारावर यापुढे रेडिओमध्ये निवेदक म्हणून एका महिन्यात काम करता येतं, रेडिओ जॉकी किंवा आर. जे. बाबतही हीच अवस्था आहे.

**(पुढे पहा....)**

त्यामुळे छंद म्हणून आपण नेहमीचा व्यवसाय सांभाळून हे काम करू शकतो. यासाठी काय आवश्यकता आहे? तर साहित्य, संगीत आणि नाटक यापैकी किमान दोन गोष्टींचा आपला सखोल अभ्यास हवा. आणि भाषेचं उत्तम ज्ञान तर हवंच. उच्चार स्पष्ट हवेत, प्रमाण मराठी भाषा बोलता यायला हवी. आवाजाची पट्टी भावानुकुल वाचन याचा सराव करायला हवा. माईक हाताळण्याची सवय व्हावी, रंगमंचाची भीती जावी यासाठी 'बोलण्याची एकही संधी गमवायची नाही ! असा निश्चय आपण या क्षणापासून करायला हवा.

-किशोर सोमण

**प्रश्न:**

१) मोठेपणी आपण कोण होणार या प्रश्नाची हमखास मिळणारी उत्तरे कोणती ?

२) डॉक्टर पदवी संपादन केल्यानंतरही इतर क्षेत्रात नाव प्राप्त केलेल्या व्यक्तींची नावे सांगा.

३) आवाजाच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ?

४) रेडिओ निवेदक होणाऱ्यांसाठी लेखक काम सूचना देतोय ?

५) वरील उताऱ्यास आपण कोणते शीर्षक सूचवाल ?

**किंवा**

**आ)** माणसाचे अनेक मित्र असतात. पण निसर्गासारखा दुसरा सखा नाही. उंच पर्वत, निळेभोर आकाश, अथांग पाणी यांच्याप्रमाणेच पृथ्वीला रमणीयता आणली आहे. वृक्षवेलींनी इवल्याशा तृणपात्यापासून वटवृक्षापर्यंत झाडांची विविध रूपे मनाला किती हरखून टाकतात! छोट्याश्या बीजातून इवलाले अंकूर मातीत डोक वर काढतात आणि तरातरा वाढत केव्हा गगनाला भिडतात, ते कळतच नाही. फुलत-फळत राहणं हा झाडांचा धर्म. माणसातली विकासाची उर्मी ती जागवतात. नानाविध रंगरूपांच्या पानाफुलांनी डवरणारी झाडे आपल्या मनात चैतन्य निर्माण करतात. नदी ही ईश्वराची वाहती करुणा आहे, असे म्हणतात. तशी वृक्षे झाडे, लता, वेली ही भूतलावर अवतरणारी ईश्वराचीच रूपे आहेत. जमिनीचा थर भेदून वर येणारे तृणाचे पाते आपल्याला सृजनाचा संदेश देते. म्हणून तर मंगेश पाडगावकरांनी इवल्याश्या तृणपात्याचा 'सत्कार' आपल्या कवितेतून केला आहे. तृणाचे पाते हा सृजनाचा साक्षात्कार असतो. हिरवा रंग हा समृद्धीचे प्रतीक मानला जातो. हिरवा, गर्द हिरवा, पोपटी अशा नाना रंगच्छटांनी बहरलेली झाडे मनाला आल्हाद देतात. सुष्ट येवो व दुष्ट, पाणी घालणारा येवो नाही तर फांद्या तोडणारा, झाडे सर्वांनाच आपल्या कवेत घेतात. शीतल सावली देतात. फुलांच्या गंधाने प्रसन्न करतात आणि रसाळ फळांनी तृप्ती देतात. पण आपण माणसे म्हणजे स्वार्थात रमलेले किडे. देण्यापेक्षा घेण्याचेच हिशेब आपल्या मनात चालू असतात. केवळ घेण्यापेक्षा देण्यात आनंद असतो, हे झाडेच आपणास शिकवतात. झाडे आपल्या बागा आणि दिवाणखानेच सुशोभित करीत नाहीत तर आपली मनेही सुशोभित करतात. झाडे आपणास प्राणवायू देतात असे विज्ञान सांगते. त्यामुळे शरीराला जसे चैतन्य मिळते तसे मनालाही मिळते. माणसाच्या मनात शीतलता, प्रसन्नता, आनंद झाडे देतात. झाडांच्या दर्शनामुळे आपले मन चैतन्याने फुलून येते.

**(पुढे पहा....)**

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' या तुकारामांच्या उद्गारांत केवढा अर्थ भरलेला आहे. हे झाडांजवळ गेल्याशिवाय कळणार नाही. खरे म्हणजे, आपल्या हालत्या फांदयांनी आणि सळसळणाऱ्या पानांनी झाडे माणसाला सतत बोलावत असतात.

**प्रश्न**:

१) पृथ्वीला रमणीयता कशाने आणली आहे ?
२) हिरवा रंग कशाचा प्रतीक मनाला जातो ?
३) लेखकाच्या मते, जमिनीचा थर भेदून वर येणारे तृणाचे पाते माणसाला कोणता संदेश देते ?
४) झाडांचे मानवी जीवनातील महत्व वरील उताऱ्याच्या आधारे सांगा.
५) वरील उताऱ्यास आपण कोणते शीर्षक सूचवाल ?

**प्र.५ अ)** पुढीलपैकी कोणतेही **दोन** लघुत्तरी प्रश्न सोडवा. **१५**

१) भाषांतर : शास्त्र की कला ? यावर टिपण लिहा.
२) आदर्श भाषांतराकाराकडे कोणत्या क्षमता असाव्यात ?
३) पुढील उताऱ्याचे आकलन करून सारांश तुमच्या शब्दात लिहा.

साहित्य ही गरजेची गोष्ट नाही असे सर्वसाधारणपणे मानले जाते. हे विधान आपण सामान्यत: पुस्तकांच्या खपाच्या संदर्भात करतो. साहित्याची पुस्तके कमी खपतात. कारण लोक ती पुरेशा प्रमाणात विकत घेत नाहीत. काही गरजेच्या गोष्टींसाठी (अन्नधान्य, खाद्यपदार्थ, औषधे वगैरेसाठी ) आपण जसा पैसा खर्च करतो तसा तो पुस्तकांसाठी करीत नाही ही गोष्ट खरी आहे. तरीही सर्वसाधारणपणे माणसाचा या ना त्या रूपाने सतत साहित्याशी संबंध येतच असतो, हीही गोष्ट तितकीच खरी आहे. पुस्तक हा साहित्याच्या आस्वादाचा एक प्रकार आहे. तसेच दुसरेही काही प्रकार आहेत. उदा. चित्रपट पाहणे, नाटक पाहणे, दूरदर्शनवरील कथा-कादंबऱ्यांवरील आधारित कार्यक्रम पाहणे. अगदीच साधा आणि सर्वांत प्राचीन प्रकार म्हणजे कुणाकडून तरी गोष्ट ऐकणे. मुले आजीकडून, गुरुजींकडून, मोठी माणसे हरदासांकडून, कीर्तनकारांकडून किंवा गप्पीदास मित्रांकडून, कुणाच्या न कुणाच्या गोष्टी ऐकत असतात. अशा विविध प्रकारांनी माणसाचा साहित्याशी संबंध येतच असतो. तसा संबंध यावा अशी त्याची धडपड असते. पुस्तकांच्या वाचनात पैशाचा आणि मानसिक शक्तीचा खर्च होतो. त्यामुळे वाचनाकडे माणसाची ओढ कमी असते. मुद्दाम लहानपणापासून सवय लागल्याशिवाय किंवा लावल्याशिवाय वाचनाची सवय लागतच नाही. ती एकदा लागली की मग मात्र ती कधी सुटत नाही! पण वाचनाची सवय न लागलेल्या लोकांनासुद्धा ऐकण्याच्या आणि पाहण्याच्या रुपात साहित्याची गरज भासतच असते.

**(पुढे पहा....)**

४) पुढील उताऱ्याचे आकलन करून सारांश तुमच्या शब्दात लिहा.

मानवी जीवनात संस्कारांना अत्यंत महत्व आहे. कारण संस्कारांनीच माणूस घडत असतो. अनेक घटना आपल्यावर संस्कार घडवित असतात. कारण शिक्षण घेत असताना गुरुजनांकडून आणि आपण वाचलेल्या पुस्तकांतून आपल्याला मिळालेले ज्ञान, संस्काराचा ठसा उमटवीत असते. आपल्याला आकर्षित करतात ते कला, साहित्य, शास्त्र आदि विषय. आपल्याला घडवणाऱ्या ज्या ज्या असंख्य शक्ती आपल्या जीवनावर प्रभाव टाकीत असतात. त्यातली साहित्याची शक्ती ही एक महान शक्ती मानावी लागते.

साहित्य प्रथम आपल्याला भेटते ते माणसांच्या साध्या साध्या शब्दांतून. कारण शब्द हे साहित्याचे माध्यम आहे. जेव्हा आपण भाषा बोलायला लागतो तेव्हा आपला साहित्याशी परिचय घडून झालेला असतो. धबड म्हणजेच नुसताच ध्वनी नाही, तर एकेक शब्द म्हणजे असीम अर्थाचे भांडार. लहान मूल जेव्हा 'आई' हा शब्द शिकते तेव्हा त्यातून केवढा महान अर्थ त्याच्यापाशी येतो. आई म्हणजे नुसतेच एक शरीर नाही, नुसतीच एक व्यक्ती नाही तर त्या मुलाला सरंक्षण, सुरक्षितता, पोषण, प्रेम, उब, आधार, आश्रय देणारे त्याचे सर्वस्व. मूल प्रथम शब्द शिकते आणि मग वाक्य बोलू लागते, गोष्टी ऐकू लागते, त्या गोष्टींतून मानवी जीवनाचे पडसाद त्याला प्रथम एकू येऊ लागतात. त्याच्या मेंदूत कल्पनाशक्तीचे चलनवलन होऊ लागते. मूल जरा मोठे होऊ लागताच ते स्वतः काहीतरी कल्पना रचून त्यात स्वतःचा अर्थ भरू लागते, स्वतःचे एक वेगळेच विश्व निर्माण करते.

**प्र.५ आ)** पुढीलपैकी पारिभाषिक इंग्रजी शब्दांच्या मराठी प्रतिशब्दांशी जोड्या जुळवा. ०५

| | |
|---|---|
| १) Ballad | अ) महाकाव्य |
| २) Epic | आ) शोकांतिका |
| ३) Novel | इ) पोवाडा |
| ४) Comedy | ई) कादंबरी |
| ५) Tragedy | उ) सुखात्मिका |

---